# शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलीत

# एम्स / आयआयटी / जेईई पीपीई फाउंडेशन बॅच निवड चाचणी - २०२१

वैद्यकीय क्षेत्रातील अत्युच्च्य दर्जाचे १५ एम्स, जीपमेर व देशभरातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील १५ टक्के राष्ट्रीय पातळीवरील जागांच्या प्रवेशासाठी एम्स बॅच आणि अभियांत्रीकी क्षेत्रातील अत्युच्च्य दर्जाचे २३ इंडियन इन्स्टिटयुटस ऑफ टेक्नॉलॉजी (IITs), ३० नॅशनल इन्स्टिटयुटस् ऑफ टेक्नॉलॉजी (NITs), .... इंडियन इन्स्टिटयुटस् ऑफ इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी (IIITs), ७ इंडियन इन्स्टीटयुटस ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च (IISERs), इंडियन इन्स्टीटयुटस् ऑफ सायन्स, बेंगलुरू (IISC), नॅशनल इन्स्टीटयुट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (NISER) आणि इंडियन इन्स्टीटयुट ऑफ स्पेस टेक्नॉलॉजी (IIST) तिरुवअनंतपुरम्, या सारख्या स्वायत्त महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी विविध राज्यातील हजारो विद्यार्थी धडपडत असतात. सदरील महाविद्यालयातील प्रवेशासाठी NEET, JEE (Main), JEE (Advanced), KVPY, NEST यासारख्या राष्ट्रीय पातळीवरील परिक्षा घेतल्या जातात. या परीक्षांसाठी ११ वी आणि १२ वी विज्ञान विषयाचा एकत्रीत अभ्यासक्रम असतो. तसेच काही प्रतिथयश खाजगी अभियांत्रीकी महाविद्यालये जसे BITS, VIT, Manipal Institute, Tolani Maritime Institute (TMI) अशा महाविद्यालयातील प्रवेशासाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा असतात.

उपरोक्त परिक्षेसाठी सर्वात जास्त विद्यार्थी महाराष्ट्रातून बसतात. परंतू तुलनेने पात्र विद्यार्थी संख्येबाबतीत महाराष्ट्राचा खूपच खालचा क्रमांक लागतो. यासाठीची खरी कारणे विद्यार्थ्यांना परिक्षेच्या तयारीसाठी पुरेसा कालावधी न मिळणे, योग्य मार्गदर्शन व अभ्यास व्यवस्थापनाचा अभाव ही आहेत. त्यामुळे शिव छत्रपती शिक्षण संस्थेने २०१६ पासून एम्स व आयआयटी परीक्षांसाठीच्या तयारीसाठी महाराष्ट्रातील (विशेषतः मराठवाड्यातील) विद्यार्थ्यांचा एम्स/एनआयटी/आयआयटी इ. महाविद्यालयातील टक्का वाढविण्यासाठी अधिक जोमाने प्रयत्न करण्याचे ठरवले. यासाठी शिव छत्रपती शिक्षण संस्थेद्वारे संचलीत **सीईटी सेल** या विभागातर्फे खास वेगळी तयारी करुन घेतली जाते. याचाच परिपाक म्हणजे वरील सर्व परीक्षेत मागच्या काही वर्षापासून मिळालेले यश हे दीपस्तंभासारखे आहे. दर वर्षी वरील सर्व महाविद्यालयात वाढीव संख्येने आमचे विद्यार्थी प्रवेश मिळवत आहेत. या तयारीचा भाग म्हणून एम्स (पीसीबी) आणि आयआयटी (पीसीएम) बॅचसाठी विद्यार्थ्यांची निवड स्क्रिनिंग टेस्ट द्वारे करण्यात येत आहे.

**निवड चाचणी (SCREENING TEST) २०२१ :**

या फाउंडेशन वर्गातील प्रवेशासाठी संस्थेमार्फत **बुधवार, दिनांक २१ एप्रिल २०२१** रोजी निवड चाचणी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेतील गुणवत्तेनुसार वैद्यकीय (PCB - एम्स बॅच) आणि अभियांत्रिकी (PCM - आयआयटी बॅच) करीता विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. निवड करताना संवैधानिक आरक्षण विचारात घेतले जाईल.

**प्रवेश पात्रता : २०२१ या वर्षी १० वी बोर्ड (स्टेट, सीबीएसई, आयसीएसईट,ई.) परीक्षा दिलेले विद्यार्थी सदरील परीक्षेसाठी पात्र असतील.**

**विशेष सूचना : पीसीएम किंवा पीसीबी यापैकी एकच पेपर देता येऊ शकतो. दोन वेगवेगळ्या परिक्षा होणार नाहीत. या करीता परीक्षेचा पर्याय विचारपूर्वक निवडावा. नंतर बदल केला जाणार नाही.**

**निवड चाचणीचे परीक्षेचे स्वरुप :**

वरील बॅचसाठीची निवड प्रक्रिया दोन फेरीत राबवली जाईल.

**पुर्व परीक्षा** (Priliminary Exam): स्क्रिनिंग टेस्ट साठी नोंदणी शुल्क भरुन अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने घेण्यात येईल. या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुख्य परीक्षेसाठी पीसीबी गट १००० आणि पीसीएम गट ६०० विद्यार्थी निवडले जातील.

**मुख्य परीक्षा** (Main Exam): पुर्व परीक्षेतुन निवड झालेले विद्यार्थीच या फेरीसाठी पात्र असतील. ही परीक्षा ऑनलाईन किंवा ऑफलाईन या बाबतचा निर्णय यथावकाश घेतला जाईल.

**पुर्व परीक्षा प्रक्रिया :**

१. परीक्षेसाठी नाव नोंदणी अर्ज www.junior-shahucollegelatur.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. नाव नोंदणी शुल्क रुपये २००/- राहील.

३. नोंदणी शुल्क भरण्यासाठी आपण DEBIT CARD/NET BANKING/CREDIT CARD चा वापर करावा.

४. ही परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतली जाईल. परीक्षा बहुपर्यायी (Multiple Choice Questions) स्वरुपाची असेल.

५. प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय असतील. त्यापैकी सर्वात योग्य एकच पर्याय निवडावयाचा आहे.

६. परीक्षेचा कालावधी ०२ तासाचा असेल.

७. विद्यार्थ्यांना PCB / PCM पैकी एकच परिक्षा देता येईल.

८. **परीक्षा फक्त इंग्रजी माध्यमात घेतली जाईल.**

**प्रश्नपत्रिकेचा आराखडा**

**विभाग - ०१ :**

**प्रश्न संख्या :** ३० प्रश्न, **एकूण गुण :** ४०

**अभ्यासक्रम :** इयत्ता १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अपेक्षीत इंग्रजी व्याकरण , तार्किक योग्यता कौशल्य (LOGICAL APTITUTDE) आणि मुलभूत गणित प्रत्येकी १० प्रश्न.

**गुणदान पध्दत :** इंग्रजी आणि तार्किक योग्यता कौशल्य या विषयासाठी प्रत्येक बरोबर उत्तरासाठी १ गुण आणि गणित या विषयासाठी प्रत्येक बरोबर उत्तरासाठी २ गुण. अनुत्तरीत किंवा चुकीच्या उत्तरास शुन्य गुण.

**विभाग - ०२ :**

**अ) एम्स बॅच : पीसीबी ग्रुप -**

प्रश्नसंख्या : ८० प्रश्न (भौतिकशास्त्र - २० , रसायनशास्त्र - २०, जीवशास्त्र - ४० )

एकुण गुण : ३२०

**अभ्यासक्रम :** इयत्ता १० वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, सीबीएसई व आयसीएसई या तीनही बोर्डात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र अभ्यासक्रमात असणारे कॉमन टॉपीक्स/आर्टिकल्स.

**(अभ्यासक्रमाच्या सविस्तर माहितीसाठी वेबसाईट www.junior-shahucollegelatur.org.in वर भेट द्या.)**

**ब) आयआयटी बॅच : पीसीएम ग्रुप -**

प्रश्नसंख्या : ६० प्रश्न (भौतिकशास्त्र - २० , रसायनशास्त्र - २०, गणित - २० )

एकुण गुण : २४०

**अभ्यासक्रम :** इयत्ता १०वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, सीबीएसई व आयसीएसई बोर्ड भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित तीनही बोर्ड सीलॅबस मध्ये कॉमन असणारे टॉपीक्स. **(अभ्यासक्रमाच्या सविस्तर माहितीसाठी वेबसाईट www.junior-shahucollegelatur.org.in वर भेट द्या.)**

**गुणदान पध्दत (दोन्ही ग्रुपसाठी) : विभाग - ०२**

प्रत्येक बरोबर उत्तरास ०४ गुण.

प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी मिळालेल्या गुणातून ०१ गुण वजा केला जाईल.

प्रश्न अनुत्तरीत ठेवल्यास त्या प्रश्नास शुन्य गुण दिले जातील.

**गुणवत्ता यादी :**

१. पुर्व परीक्षेतील विभाग १ आणि विभाग २ मधील एकत्रीत गुणावर आधारित गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

२. पीसीबी गटासाठी पहिले १००० विद्यार्थी अधिक १००० व्या क्रमांकावरील विद्यार्थ्याला मिळालेल्या गुणाएवढे गुण मिळवलेले विद्यार्थी मुख्य परीक्षेसाठी पात्र होतील.

३. पीसीएम गटासाठी पहिले ६०० विद्यार्थी अधिक ६०० व्या क्रमांकावरील विद्यार्थ्याला मिळालेल्या गुणाएवढे गुण मिळवलेले विद्यार्थी मुख्य परीक्षेसाठी पात्र होतील.

**विशेष सूचना :**

संवैधानिक आरक्षण राबवताना एखाद्या गटातील मुख्य परीक्षेसाठी पात्र विद्यार्थी संख्या पुरेशी नसेल तर त्या गटातील कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी पात्र करण्यात येईल. या बाबतचे सर्व अधिकार शिवछत्रपती शिक्षण संस्था आपल्याकडे राखुन ठेवत आहे.

**मुख्य परीक्षेचे स्वरुप :** पुर्व परीक्षेत निवड झालेले जे विद्यार्थी मुख्य परीक्षेसाठी नोंदणी करतील फक्त तेच विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र असतील.

**परीक्षेची तारीख :** परीक्षेची तारीख आणि वेळ पुर्व परीक्षेच्या निकालाच्या वेळी कळवली जाईल.

**मुख्य परीक्षेसाठी नोंदणी पध्दत :**

१. परीक्षेसाठी नाव नोंदणी अर्ज www.junior-shahucollegelatur.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

२. नोंदणी शुल्क रु. १००/- असेल.

३. नोंदणी शुल्क भरण्यासाठी आपण DEBIT CARD/NET BANKING/CREDIT CARD चा वापर करावा.

४. परीक्षा बहुपर्यायी (Multiple Choice Questions) स्वरुपाची असेल.

५. प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय असतील. त्यापैकी सर्वात योग्य एकच पर्याय निवडावयाचा आहे.

६. परीक्षेचा कालावधी ०२ तासाचा असेल.

७. प्राथमिक परीक्षेसाठी जो गट निवडला असेल त्याच गटाच्या मुख्य परीक्षेसाठी संबंधीत विद्यार्थी पात्र राहील.

८. **परीक्षा फक्त इंग्रजी माध्यमात घेतली जाईल.**

**मुख्य परीक्षा : प्रश्नपत्रिकेचा आराखडा -**

**अ) एम्स बॅच : पीसीबी ग्रुप -** एकुण गुण : ४००

प्रश्नसंख्या : १०० प्रश्न (भौतिकशास्त्र - २५ , रसायनशास्त्र - २५, जीवशास्त्र - ५० )

**अभ्यासक्रम :** इयत्ता ८,९ व १० वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, सीबीएसई व आयसीएसई या तीनही बोर्डात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र अभ्यासक्रमात असणारे कॉमन टॉपीक्स/आर्टिकल्स.

**ब) आयआयटी बॅच : पीसीएम ग्रुप -** एकुण गुण : ३००

प्रश्नसंख्या : ७५ प्रश्न (भौतिकशास्त्र - २५ , रसायनशास्त्र - २५, गणित - २५ )

**अभ्यासक्रम :** इयत्ता ८,९ व १०वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, सीबीएसई व आयसीएसई बोर्ड भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, आणि गणित तीनही बोर्ड सीलॅबस मध्ये कॉमन असणारे टॉपीक्स.

**(पूर्व परीक्षेच्या निकालाच्या वेळी मुख्य परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम www.junior-shahucollegelatur.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिला जाईल)**

**वर्गाची सुरुवात :**

- मुख्य परीक्षेच्या निकालानंतर १० दिवसांनी एम्स/आयआयटी फाउंडेशन बॅचचे वर्ग सुरु होतील.
- कोरोना परिस्थितीनुसार वर्ग ऑफलाईन/ऑनलाईन पध्दतीने घेतले जातील.
- या वर्गात प्रवेशासाठी वेगळे शैक्षणिक शुल्क भरावे लागेल. जे विद्यार्थी शुल्क भरतील असेच विद्यार्थी वर्ग करण्यास पात्र असतील.
- एम्स/आयआयटी फाउंडेशन बॅच मधील प्रवेश तात्पुरत्या स्वरुपाचे असतील. या विद्यार्थ्यांचा ११ वी विज्ञान वर्गातील प्रवेश दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवत्तेनुसार केला जाईल.

# शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर

## एम्स / आयआयटी / जेईई पीपीई फाउंडेशन बॅच निवड चाचणी - २०२१

## वेळापत्रक - २०२१

### पुर्व परीक्षा

| | | |
|---|---|---|
| पुर्व परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी कालावधी | : | ०१ एप्रिल २०२१ सकाळी ११.०० पासून ते<br>१२ एप्रिल २०२१ सायंकाळी ०५.०० पर्यंत |
| नोंदणी शुल्क | : | रुपये २००/- |
| वेबसाईटवरती हॉलतिकिट उपलब्ध | : | १४ एप्रिल २०२१ ते १५ एप्रिल २०२१. |
| पहिली मॉक टेस्ट | : | १६ एप्रिल २०२१ (ऑनलाईन) |
| दुसरी मॉक टेस्ट | : | १८ एप्रिल २०२१ (ऑनलाईन) |
| पुर्व परीक्षा दिनांक | : | २१ एप्रिल २०२१. |
| उत्तरसुची वेबसाईटवरती अपलोड करणे | : | २१ एप्रिल सायंकाळी ०५.०० नंतर |
| उत्तरसूचीतील आक्षेप नोंदवणे | : | २१ एप्रिल २०२१ ते २२ एप्रिल सायंकाळी ०५-०० वाजेपर्यंत. |
| निकाल जाहीर | : | २५ एप्रिल २०२१ सायंकाळी ०५-०० नंतर |

### मुख्य परीक्षा

| | | |
|---|---|---|
| मुख्य परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी | : | २६ एप्रिल २०२१ सायंकाळी ०५-०० नंतर |
| मुख्य परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी कालावधी | : | २७ एप्रिल २०२१ सकाळी ११.०० पासून ते<br>३० एप्रिल २०२१ सायंकाळी ०५.०० पर्यंत |
| नोंदणी शुल्क | : | रुपये १००/- |
| मुख्य परीक्षा दिनांक | : | नंतर जाहीर केला जाईल |
| उत्तरसुची वेबसाईटवरती अपलोड करणे | : | नंतर जाहीर केला जाईल |
| उत्तरसूचीतील आक्षेप नोंदवणे | : | नंतर जाहीर केला जाईल |
| मुख्य परीक्षा निकाल | : | नंतर जाहीर केला जाईल |
| प्रवेशाची अंतिम तारीख | : | नंतर जाहीर केला जाईल |
| वर्गाची नियमीत सुरुवात | : | नंतर जाहीर केला जाईल |